# मर्यादा पुरुषार्थाचे नवविधा निर्धार

## निर्धार ०१

राम माझा राजा आहे व मी राजारामाचा सैनिक आहे. माझा ह्या राजाचा व त्याच्या अधिराजाचा (Kingmaker)-दत्तगुरुंचा स्वभाव,संकल्प व बल ह्यांची माहिती करुन घेणे व रामाला वनवासाला कोण व कसे पाठवतो हे जाणणे एवढाच माझा ज्ञानमार्ग.

## निर्धार ०२

रामाच्या वानरसैन्यातील उत्तम सैनिक बनण्यासाठी आवश्यक ती शिस्त - अनुशासन, देहाला ( शरीर, प्राण, मन व बुद्धी ) ह्यांना लावणे एवढाच माझा योगमार्ग.

## निर्धार ०३

आपण रामाचे सैनिक आहोत हे जाणून आपले कुठलेही काम उत्कृष्टरीत्या कसे करावे हे शिकणे एवढाच मझा कर्ममार्ग.

## निर्धार ०४

वानरसैनिकाने स्वत:चे सामर्थ्य सातत्याने वाढवतच राहणे एवढाच माझा भक्तिमार्ग.
(श्रीहनुमंत,बिभिषण,भरत व शबरी ह्यांचे आचरण )

## निर्धार ०५

रामाच्या वानरसेनेत सामील झाल्यापासून लंकेपर्यंतचा, सेनानायक हनुमंत व वानरसेनाचा प्रवास म्हणजेच ‘सुंदरकांड’मार्ग. ह्या प्रवासाचे चिंतन व अभ्यास (Study and Practice) हाच दु:खनिवृत्तीचा व परमेश्वरप्राप्तीचा सर्वांत सोपा उपाय आहे.

## निर्धार ०६

रावणाशी युद्ध माझे राम-लक्ष्मणच करणार. मी फक्त त्यांचा उत्तम सैनिक बनून राहणार.

## निर्धार ०७

रावणाशी लढणाऱ्या माझ्या राम-लक्ष्मणांचे रक्षण हनुमंतच करणार . मी हनुमंताचेच मार्गदर्शन स्वीकारणार.

## निर्धार ०८

रावणचा नाश राम करतोच. रामराज्य स्थापन होतेच.

## निर्धार ०९

जो आज रामाचा वानर तोच पुढे कृष्णाचा गोप. अर्थात् निरंतर सख्य. कधीही न बुडणाऱ्या गोकुळात सदैव निवास.